Shikshan Prasarak Mandal's
**GOPAL KRISHNA GOKHALE COLLEGE, KOLHAPUR.**
'B' Ward, Subhash Road, Kolhapur Pin- 416 012. P. Box. No.-3
Phone No- (0231) 2642540 /2642340
NAAC Accredited "B" (C.G.P.A. 2.85) 2nd Cycel
E-Mail:gkgcollege1950@gmail.com U-DISE - **27341304307** Web Site:- www.gkgcollege.com
Vice-Principal – Shri S. H. Pisal, M. Sc., B. Ed.
I/C Prin. Dr. P. K. Patil M. A, M. Phil., Ph.D.

जा.क्र./जीकेजी/ /२०२०-२०२१ दिनांक:- ०३/१०/२०२०

# सुचना

मागील शैक्षणिक वर्षात सेंट्रल सेक्टर स्कॉलरशीपसाठी अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळणेसाठी या शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती नूतणीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज व आवश्यक कागदपत्रे दिनांक २५/१०/२०२० पूर्वी महाविद्यालयात जमा करावेत. तसेच शिष्यवृत्तीसंदर्भातील सविस्तर माहिती नोटीसबोर्डावर लावण्यात आलेली आहे.

तरी विद्यार्थ्यांनी नोटीस बोर्डावरील सुचना सविस्तर वाचून अंतिम मुदतीपूर्वी फॉर्म कार्यालयात श्री. पाटील एस. एस. यांचेकडे जमा करावा. अर्ज भरताना कोणत्याही प्रकारची अडचण असलेस कार्यालयात श्री. पाटील एस. एस. यांच्याशी संपर्क साधावा. अंतिम मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही तक्रारीचा विचार केला जाणार नाही. मागील वर्षी फॉर्म भरला आहे परंतु अद्यापही शिष्यवृत्तीची रक्कम खात्यावरती जमा झाली नसली तरीही ऑनलाईन फॉर्म भरला आहे परंतु अद्यापही शिष्यवृत्तीची रक्कम खात्यावरती जमा झाली नसली तरीही ऑनलाईन फॉर्म भरून कागदपत्रे महाविद्यालयात जमा करणे आवश्यक आहे याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी .

G. K. GOKHALE COLLEGE KOP.

प्र. प्राचार्य,
गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय,
कोल्हापूर.

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

.................................................................

## जाहिरात

**भारत सरकारची महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना सन २०२०-२१**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी फेब्रुवारी / मार्च २०२० मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (इयत्ता १२ वी) प्रमाणपत्र परीक्षेमध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना पुढील पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारची सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेतर्फे राबविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी केंद्रशासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७४१७ इतके नवीन मंजूरीसाठी संच निर्धारित केलेले आहेत. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी **नविन मंजूरीचे आणि नूतनीकरणाचे** (Renewal) **अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने** मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पद्धतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येईल. विद्यार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विद्यार्थ्यांच्या खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येईल.

- **किमान पात्रता व अटी :**

१. अर्जदार भारतीय नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.
३. अर्जदाराच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा अधिक नसावे.
४. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे. मात्र कोणताही पदविका अभ्यासक्रम तसेच पत्राद्वारा व दूरस्थ शिक्षणासाठी (Diploma, Correspondence Courses & Distance Education) ही शिष्यवृत्ती योजना लागू नाही.
५. केंद्र शासनाच्या नियमानुसार सदर शिष्यवृत्ती, अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ४ वर्षे व वैद्यकिय अभ्यासक्रमासाठी व कला वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ५ वर्षापर्यंत देय राहील.
६. खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास / न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहील. विद्यार्थ्याचा बँक खाते क्रमांक मेजर असावा व जॉईंट खाते नसावे.
७. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटीचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्याची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल/ वसूल केली जाईल.

❖ **अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे:-**

- **नवीन मंजूरी** / (Fresh)-
  १. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका.
  २.पालकांचे राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडील वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
- **नूतनीकरण** (Renewal)-
  १. मागील वर्षाची गुणपत्रिका.

शिष्यवृत्तीचे नूतनीकरणासाठी मागील वर्षाच्या परीक्षेत किमान ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.